

सत्तेच्या शिखरावरुन लोकांच्या दारी : चंद्रकांत पाटील यांची झोपडपट्टीत भावनिक भेट

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 09/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 261 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# भाजपाला मिळणार नवा राष्ट्रीय अध्यक्ष?

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीची धूम सुरू आहे. या निवडणुकीनंतर भाजपाला नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळू शकतो, असे संकेत एका बड्या नेत्याने दिले आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाबाबत राजकीय वर्तुळात चर्चा आहेत.**



अनेक नेत्यांची नावे या पदासाठी आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिकाही यात महत्त्वाची ठरू शकते, असेही म्हटले जात आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय जनता पक्षाच्या पुढील राष्ट्रीय अध्यक्षांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. बिहार विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पक्षाला नवीन अध्यक्ष मिळेल असे त्यांनी सांगितले. तसेच पक्षात कोणताही मतभेद नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बिहार विधानसभा निवडणुकीनंतर तुम्हाला भारतीय जनता पक्षाच्या पुढील अध्यक्षाबद्दल समजेल. आमच्या पक्षात कोणताही वाद नाही.आरएसएस कधीही भाजपाच्या राजकीय निर्णयात हस्तक्षेप करत नाही. मी लहानपणापासूनच आरएसएसशी संबंधित आहे. आरएसएस देशभक्तीची चेतना निर्माण करते, असेही राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे.बिहारमध्ये जनतेच्या प्रतिसादामुळे आम्हाला विश्वास आहे की, आम्ही सरकार स्थापन करू. दोन तृतीयांश बहुमत मिळवू. नितीश कुमार मुख्यमंत्री असतील. त्यांच्याच नेतृत्वाखाली निवडणूक लढवली जात आहे, असे राजनाथ सिंह यांनी सांगितले. प्रशांत किशोर हे एक बिनमहत्त्वाचे घटक आहेत.त्यावर जास्त विचार करण्याची गरज नाही. लोकांना माहिती आहे की, कोण मते विभागण्यासाठी लढत आहे आणि कोण सरकार स्थापन करण्यासाठी लढत आहे. किशोर यांच्या पक्षाला कदाचित एकही जागा जिंकता येणार नाही, असा मोठा दावा राजनाथ सिंह यांनी केला. एका मुलाखतीत राजनाथ सिंह बोलत होते.

# जमीन व्यवहाराची मी स्वत: चौकशी करणार - अजित पवार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीने केलेल्या जमीन व्यवहाराची जोरदार चर्चा सुरू आहे. काल पवार यांनी हा व्यवहार रद्द झाल्याची माहिती दिली.**



दरम्यान, उपमुख्यमंत्री पवार पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी या प्रकरणाची माहिती दिली असून या व्यवहारात पैशाची देवाण-घेवाण झालीच नसल्याची माहिती दिली. यामुळे समोरच्या पार्टीने ह सगळे कसे काय केले याची चौकशी करण्यात येणार आहे, तसेच यामध्ये कोणी कोणाची फसवणूक केली हे समोर येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.'या व्यवहाराची मला काहीही माहिती नव्हती. ज्यांनी रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये जाऊन सह्या केल्या त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरोधकांना निवडणुकीच्या काळात अशा कोणत्या बातमी मिळाली की त्यामध्ये खत पाणी घालणे हे त्यांचे काम असते, असा टोलाही पवार यांनी विरोधकांना लगावला. "एकदा चौकशी होऊ द्या. एकनाथ शिंदे यांनीही तेच सांगितले आहे. या प्रकरणाची समिती बारकाईने चौकशी करेल. जमिनीचा व्यवहार झाला होता पण त्यांना अजून पझेशन मिळाले नव्हते. सरकारी जमिनीचे व्यवहार होताच कामा नये, सरकारी अधिकाऱ्यांनी ते थांबवायला पाहिजे होते, असे अजित पवार म्हणाले."पुन्हा अशा पद्धतीच्या जमिनींचे व्यवहार होऊ नये म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. या प्रकरणी विकार खरगे यांची टीम तपास करेल. आपल्या राज्याचा टॅक्स बुडता कामा नये, असंही अजित पवार म्हणाले. मी प्रशासनाला कालच एक सल्ला दिला. माझ्या जवळचे, लांबचे नातेवाईक अशा पद्धतीने व्यवहार किंवा कामे करत असतील तर कोणाच्याही दबावाल घाबरू नका. नियमावर बोट ठेवूनच काम करा, असे मी सांगितले आहे.

माझे कालपर्यंत उशीरापर्यंत काम सुरू होते, मी आज पुण्याला आलो. पार्थ मुंबईत आहे. मी त्याला भेटून सांगणार आहे, असेही अजित पवार म्हणाले. एक रुपया न घेता ही समोरच्या पार्टीने कसे काय एवढे केले. आता यामध्ये कोण फसले आहे याची चौकशी केली जाणार आहे, या सर्व प्रकरणाची चौकशी झाल्यानंतर मी पत्रकार परिषद घेऊन माहिती देणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

# वाकड ते मामुर्डी रस्ता होणार 'सुसाट'!

## आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वाची आढावा बैठक

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिंचवड मतदार संघातून जाणारा मुंबई बंगळुरूमहामार्गावरील वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि किवळे परिसरातील सेवा रस्त्या संदर्भातील कामांसाठी आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे.**



या सेवा रस्त्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी. आवश्यक ठिकाणी जागा हस्तांतरित करून मूलभूत सेवा सुविधांची विकास कामे देखील पूर्ण करावी अशा सूचना देखील आमदार शंकर जगताप यांनी केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुळा नदी ते भुमकर चौक आणि भुमकर चौक ते मुळा नदी हा गोल सर्कल हा मार्ग प्राधान्याने पूर्ण केला जावा. यामधील पावसाळी पाणी निचरा, सांडपाणी निचरा व्यवस्था, विविध सेवा वाहिन्यांसाठी डक्ट सुविधा तयार करण्यासाठी प्राधान्य द्यावे यांसारख्या सूचना देखील आमदार जगताप यांनी दिल्या आहेत.चिंचवड मतदार संघातील पिंपळे गुरव येथील कार्यालयात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वाची आढावा बैठक घेतली. यावेळी वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील सेवा रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश यावेळी आमदार जगताप यांनी दिले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, तांत्रिक व्यवस्थापक अंकित यादव, कार्यकारी अभियंता सुभाष घंटे, समन्वयक विनोद पाटील, तसेच हरिंद्र यादव आदी उपस्थित होते.आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, चिंचवड मतदार संघात येणाऱ्या ताथवडे, पुनावळे, रावेत, वाकड परिसराची देखील झपाट्याने वाढ झाली आहे. या परिसरात अनेक आयटी कंपन्या व मोठ्या रहिवासी सोसायटी आहेत. त्यातच हा परिसर हिंजवडी आयटी पार्कला लागून असल्याने नागरिक या परिसरात वास्तव्यास पसंती देत आहेत. येथे नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. पुनावळे, ताथवडे, वाकड येथील सब वे , मुंबई बेंगलोर हायवे लगत असणारा सर्व्हिस रस्ता हा या परिसरातील शालेय विद्यार्थी, आयटी, व औद्योगिक कामगार वर्ग, महिला, जेष्ठ नागरिक यांच्या रोजच्या प्रवासासाठी महत्वाचा आहे. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना करणे महत्वाचे आहे. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने आजची बैठक घेण्यात आली. चिंचवड मतदार संघातून जाणारा मुंबई-बंगळुरू महामार्ग आणि सेवा रस्ता हा राज्य शासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. येथील सबवे व रस्ता राज्य शासन व केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (मॉर्थ) यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेऊन सूचना केल्या.यावेळी आमदार जगताप म्हणाले, भुमकर चौक ते ताथवडे , ताथवडे ते पुनावळे अंडरपास येथील सेवा रस्त्यांचे तात्काळ डांबरीकरण करून देण्यात यावे. या माध्यमातून वाहतूक सुरळीत राहील आणि नागरिकांना कोणतेही प्रकारचा त्रास आणि वाहतूक कोंडी होणार नाही. रस्ते चांगले असल्यास येथील वाहतुकीचा स्पीड देखील वाढेल.येथील रस्त्यांच्या कामांसाठी ज्या जागा अद्याप ताब्यात आलेल्या नाही यासंदर्भात जागामालक शेतकरी यांच्याशी संपर्क साधण्यात आला आहे . राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत या जागामालकांनी चर्चा केली असून, भूसंपादनाचा विषय देखील मार्गी लावण्यात आला आहे. या रस्त्यांची गुणवत्ता अतिशय उच्च दर्जाची राखण्यात यावी. पुढील पन्नास वर्षाचे व्हिजन या कामांसाठी दिले जावे. जेणेकरून भविष्यात वारंवार रस्त्यांच्या गुणवत्तेचे प्रश्न उपस्थित राहू नये असे अशा सक्त सूचना केल्या असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले. पुनावळे, ताथवडे, वाकड अंडरपास येथे "बॉक्स पुशअप" बसवण्यासंदर्भात तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात येणार आहे, त्यानंतर तातडीने निविदा काढून हे काम पूर्ण करण्यात येईल असे देखील जगताप यांनी सांगितले

> “राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत आज महत्त्वाची आढावा बैठक घेतली. वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील सेवा रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश यावेळी अधिकाऱ्यांना दिले आहेत. मुंबई-बंगळुरू महामार्ग आणि सेवा रस्ता हा राज्य शासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. येथील सबवे व रस्ता राज्य शासन व केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (मॉर्थ) यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. या ठिकाणी महापालिका काम करू शकत नाही. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांनी तातडीने रस्त्यांची कामे पूर्ण करावी अशा सूचना केल्या.”
>
> **शंकर जगताप** आमदार, चिंचवड विधानसभा

# पिंपळे निलख येथून पीएमपी बस मार्ग सुरू करा: आपची मागणी

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपळे निलख गावातून पुणे स्टेशन, हडपसर आणि स्वारगेटसारख्या प्रमुख ठिकाणी जोडणारे महत्त्वाचे पीएमपी (PMPML) बस मार्ग काही कारणास्तव अचानक बंद करण्यात आले आहेत.**




पिंपळे निलखसाठी जीवनवाहिनी ठरलेले बस क्र. १०० (पुणे स्टेशन), बस क्र. ३३३ (हडपसर) आणि बस क्र. २१ (स्वारगेट) हे मार्ग बंद झाल्यामुळे परिसरातील नागरिकांसमोर मोठी समस्या उभी राहिली आहे.या अत्यावश्यक बस सेवा बंद पडल्याचा थेट परिणाम विद्यार्थी, नोकरदार आणि सामान्य नागरिक यांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. बस बंद असल्यामुळे या लोकांना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जाण्यासाठी अधिकचा वेळ आणि अधिकचा पैसा खर्च करावा लागत आहे. नाइलाजाने महागड्या खासगी वाहतूक साधनांचा वापर करावा लागत असल्याने नागरिकांवर मोठा आर्थिक ताण पडत आहे, तसेच वेळेवर कामावर किंवा शिक्षणस्थळी पोहोचण्यात अडचणी येत आहेत, ज्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत.या समस्येचे गांभीर्य लक्षात घेता, आम आदमी पार्टी (आप), पिंपरी-चिंचवड शहराचे अध्यक्ष रविराज काळे यांनी प्रशासनाकडे तातडीची मागणी केली आहे की, नागरिकांची ही गैरसोय त्वरित दूर करावी आणि बस क्र. १००, ३३३ आणि २१ या मार्गांवरील बससेवा तातडीने व विनाविलंब पूर्ववत सुरू करावी.जर पीएमपी प्रशासनाने या मागणीची त्वरित दखल घेऊन बंद पडलेली बससेवा पूर्ववत सुरू केली नाही, तर आम आदमी पार्टी नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडण्यास मागेपुढे पाहणार नाही. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशारा 'आप' ने दिला आहे.

# आयएसबीअँडएम पुणे तर्फे 'एचआर शेअर 2025' परिषद संपन्न

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे, : इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडीया (ISB&M), पुणे तर्फे संस्थेचा वार्षिक भव्य परिषद 'एचआर शेअर २०२५' अत्यंत उत्साहात पार पडली . विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे मार्गदर्शन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार आणि प्रा. राजू धर* यांनी केले.**




"Navigating the Future of Work: The Struggle for Space between Technology and People" या विषयावर आधारित या परिषदेत तंत्रज्ञान आणि मानव यांच्यातील नातेसंबंध, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव आणि भविष्यातील कार्यपद्धती यावर सखोल चर्चा झाली.या दोन दिवसीय परिषदेला ५०० हून अधिक प्रतिनिधी, १०० कॉर्पोरेट डेलीगेट्स आणि ५० पेक्षा अधिक कंपन्या देशभरातून सहभागी झाल्या. उद्घाटन सत्राला सीमेन्स हेल्थिनियर्सचे सीएचआरओ राहुल कुलकर्णी हे प्रमुख अतिथी, तर आदाणी रिअल्टीचे बिझनेस एचआर हेड श्रीकांत पवार हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.आपल्या भाषणात राहुल कुलकर्णी म्हणाले, "हे तंत्रज्ञान विरुद्ध माणूस नाही — तर तंत्रज्ञानासह माणूस आहे. भविष्यातील यश हे दोघे कसे एकमेकांना पूरक ठरतात यावर अवलंबून असेल."तर श्रीकांत पवार म्हणाले, "आपण अशा काळात जगत आहोत जिथे माणूस आणि तंत्रज्ञान खरोखरच एकत्रितपणे प्रगती करतील."मुख्य वक्ते *गॅब्रिएल इंडियाचे सिनियर व्हाइस प्रेसिडेंट आणि सीएचआरओ विनोद रझदान तसेच आदित्य बिर्ला ग्रुप–हिंडाल्कोचे सीएचआरओ समित बसू यांनी तंत्रज्ञानाच्या युगातील मानवी संबंध, संस्थात्मक नेतृत्व आणि परिवर्तन व्यवस्थापनावर मोलाचे विचार मांडले.या परिषदेत GAIL, ASSA ABLOY, ATOS, Boeing, Carrier, EY, Flipkart, IIFL Finance, ICICI Bank, Tata Motors, Nippon India Mutual Fund यांसारख्या नामांकित कंपन्यांतील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते .झी एंटरटेनमेंटच्या दिव्या शुक्ला यांनी मीडिया उद्योगातील एचआरच्या बदलत्या भूमिकेबाबत विचार मांडत सर्जनशीलता आणि संघटनात्मक उत्कृष्टतेचा समतोल कसा साधावा, यावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे टायटल स्पॉन्सर Black Orange Talent Executive, असोसिएट स्पॉन्सर Credila, तर को-स्पॉन्सर RTEK Sound Solutions होते.या प्रसंगी डॉ. प्रमोद कुमार, संस्थापक-अध्यक्ष, आयएसबीअँडएम म्हणाले,"भविष्य त्यांचं असेल जे तंत्रज्ञानासोबत राहायला शिकतील. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात सतत शिक्षण आणि बदलांना स्वीकारण्याची वृत्ती हेच यशाचं रहस्य असेल."AICTE मान्यता प्राप्त आणि AMBA तसेच AACSB आंतरराष्ट्रीय मानांकन असलेली आयएसबीअँडएम संस्था उत्कृष्ट व्यवस्थापन शिक्षणासाठी देशातील अग्रगण्य संस्थांपैकी एक मानली जाते.

या संस्थेचे १२,००० पेक्षा अधिक माजी विद्यार्थी ४६ देशांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये कार्यरत आहेत.'एचआर शेअर २०२५' सारखे उपक्रम म्हणजे उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दुवा मजबूत करण्याचे उत्तम उदाहरण आहे — जिथे "ज्ञानाला संधी आणि नेतृत्वाला उद्देश मिळते."

# महिलेचा जाळून खून ; पतीला अटक

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : अनैतिक संबंधांच्या संशयावरुन महिलेचा गळा आवळून खून केल्यानंतर पतीने तिचा मृतदेह गॅरेजमध्ये जाळला. पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने राख नदीत टाकून दिली आणि पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.




या प्रकरणाचा सखोल तपास करुन पोलिसांनी खून प्रकरणाचा उलगडा केला. एखाद्या चित्रपटातील कथेप्रमाणे आरोपी पतीने महिलेचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. अंजली समीर जाधव (वय ३८ रा. श्री स्वामी समर्थ संकुल, एनडीए-वारजे रस्ता, शिवणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती समीर पंजाबराव जाधव (वय ४२) याला अटक करण्यात आली. पत्नी अंजली ही २८ ऑक्टोबर रोजी वारजे परिसरातून बेपत्ता झाल्याची तक्रार आरोपी समीर याने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात दिली होती. या प्रकरणात कोणतेही धागेदोरे नसताना पोलिसांनी सखोल तपास करुन खून प्रकरणाचा उलगडा केला आणि आरोपी पती समीर याला अटक केली, अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली.आरोपी समीर याचे शिवणे परिसरात गॅरेज आहे. पत्नीचे एकाशी प्रेमप्रकरण सुरू असल्याचा संशय समीरला होता. त्याने समाजमाध्यमातील संवादावरुन पत्नीवर आरोप केले होते. या कारणावरुन त्यांच्यात वादही झाले होते. त्यानंतर त्याने पत्नीचा खून करण्याचा कट रचला. त्याने मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील खेड शिवापूर परिसरातील शिंदेवाडी भागात गोदामासाठी एक जागा भाडेतत्त्वावर घेतली होती. त्यासाठी दरमहा १८ हजार रुपये भाडे ठरले होते. २६ ऑक्टोबर रोजी पत्नी खेड शिवापूरजवळील गोगलवाडी परिसरातून बेपत्ता झाल्याची तक्रार वारजे पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानंतर हे प्रकरण ग्रामीण पोलिसांच्या राजगड पोलीस ठाण्याकडे तपासासाठी सोपविण्यात आले होते.

मात्र, वारजे पोलिसांनी याप्रकरणाचा समांतर तपास सुरू ठेवला होता.पत्नी बेपत्ता झाल्यानंतर समीर वारजे पोलीस ठाण्यात चौकशीसाठी आला होता. 'पत्नीचा शोध लागला का ?' अशी विचारणा त्याने पोलिसांकडे केली होती. वारंवार चौकशी करणाऱ्या समीरच्या हालचाली पोलिसांनी टिपल्या होत्या.

त्याचे वर्तन संशयास्पद वाटले होते. त्याने पोलिसांना दिलेल्या माहिती तफावत आढळून आली होती. पोलिसांनी ही बाब टिपली आणि त्याची चौकशी केली.सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे त्याने दिली होती. पोलिसी खाक्या दाखविताच त्याने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली.

# मॉर्डन हायस्कूल गणेशखिंड येथे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन!

## आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू कु. आरती भालेराव यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**प्रतिनिधी | वैष्णवी सायकर**

पुणे : शहरातील मॉर्डन हायस्कूल गणेशखिंड, पुणे या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५ ते २०२६ मधील वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले आहे.

हा क्रीडा सप्ताह दि. ६ नोव्हेंबर २०२५ ते ११ नोव्हेंबर २०२५ यादरम्यान संपन्न होणार आहे. या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन याच विद्यालयाची माझी विद्यार्थिनी, आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू कु. आरती भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पाचवी ते बारावी अशा वर्गात विविध खेळाचे सामने रंगले असून, अनेक गुणवंत खेळाडू आपले कलागुण या स्पर्धेत सादर करीत आहेत. या क्रीडा सप्ताहात धावणे, कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, डॉजबॉल, थ्रो-बॉल, रस्सीखेच अशा विविध प्रकारच्या खेळाचे सामने रंगत आहेत. या उद्घाटन समारंभ सोहळ्यास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रोहिणी काळे, उपमुख्यधापिका विद्या वाईकर ,पर्यवेक्षक गोरक्ष देशमुख, पिंगळे सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती व्हावळ यांनी केले.यावेळी बोलताना कु.आरती भालेराव म्हणाली की, या क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवलेला आहे हे पाहून आनंद होत आहे. मॉडर्न हायस्कूल शाळा कायमच खेळाडूंना प्रोत्साहित करण्याची काम करते. भविष्यात पुढील विद्यार्थ्यांमधून देखील असेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत, त्यासाठी शाळा कायम तुमच्या पाठीशी उभी आहे, असे भालेराव हिने म्हंटले.या सामन्यात विद्यार्थिनींने देखील मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवलेला आहे. क्रीडा सामन्या प्रसंगी विद्यालयाची माझी विद्यार्थिनी वैष्णवी सायकर आणि श्रावणी ढोक या उपस्थित होत्या. यावेळी क्रीडा अप्पासाहेब म्हमाणे, हरिदास गुट्टे, बाबा शिंदे, जया फुलपगार, स्वाती देवळे, स्वाती देसाई, वासंती विभांडिक, अर्चना सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे सामने होणार आहेत, तसेच शैक्षणिक वर्षाच्या शेवटी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पाडणार असल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.



# हंट फॉर द सीक्रेट सुपरस्टार 2025 : बालप्रतिभांचा झंकार आणि स्वप्नांना पंख देणारा सोहळा!

## 9 नोव्हेंबर रोजी डी. वाय. पाटील ऑडिटोरियम, पिंपरी-चिंचवड येथे भव्य समारोप सोहळा; इस्त्रो प्रमुख डॉ. व्ही. नारायणन प्रमुख पाहुणे

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बालप्रतिभांना प्रोत्साहन देणाऱ्या "केअर फॉर यू फाउंडेशन" या समाजसेवी संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय "हंट फॉर द सीक्रेट सुपरस्टार – सिझन 4" या भव्य उपक्रमाचा ग्रँड फिनाले रविवार, दि. 9 नोव्हेंबर 2025 रोजी डी. वाय. पाटील ऑडिटोरियम, पिंपरी-चिंचवड येथे आयोजित करण्यात आला आहे.अल्पसंपन्न बालकांना शिक्षण, संस्कार आणि संधी देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेली केअर फॉर यू फाउंडेशन ही संस्था 80G, FCRA व C S R मान्यता प्राप्त असून, या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील विविध बालसंवर्धन संस्था (Child Care Institutions) मधील मुलांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते.या स्पर्धेच्या अंतिम फेरीत राज्यभरातील ४० हून अधिक बालसंवर्धन संस्थांमधील ९० निवडक स्पर्धक सहभागी होणार असून, चित्रकला, हस्तकला, सामान्य ज्ञान आणि गायन या चार प्रमुख गटांमध्ये अंतिम सामना रंगणार आहे. यासाठी मुलांनी गेल्या काही महिन्यांपासून सातत्यपूर्ण प्रशिक्षण व प्री-फिनाले ऑडिशन दिले आहेत.कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १ वाजता भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (I S R O) अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्यासोबतच्या संवाद सत्राने होणार आहे. ते या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासातून मुलांना 'अमर्याद स्वप्न पाहण्याची' प्रेरणा मिळेल.कार्यक्रमास महाराष्ट्र पोलीस दलातील डीजी व चीफ ऑफ फोर्स वन आयपीएस कृष्ण प्रकाश हे मुख्य संरक्षक (Chief Patron) आणि स्थापन सल्लागार म्हणून उपस्थित राहतील. तर, महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा. अदिती तटकरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी राहणार आहेत. यावेळी आयुक्त नयना गुंडे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती मा. डॉ. पी. डी. पाटील, आदी मान्यवरांची देखील उपस्थिती राहणार आहे.या उपक्रमामागील प्रेरणास्थान म्हणजे संस्थेच्या संस्थापक व विश्वस्त सीए पायल सारडा राठी. त्यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाने हजारो बालकांच्या जीवनात शिक्षण, आत्मविश्वास आणि स्वावलंबनाचा प्रकाश फुलवला आहे. या वर्षीच्या फिनालेमध्येही एक अनोखी सामाजिक परंपरा कायम राखण्यात येणार आहे. स्पर्धेतील ८० विजेत्या बालकांची निवड आयुष्यभर शिक्षण आणि निवासी प्रायोजकत्वासाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या झगमगाटानंतरही त्यांच्या भविष्याची काळजी संस्थेकडून घेतली जाईल.या उपक्रमाला महिला व बालविकास विभाग, डी. वाय. पाटील विद्यापीठ (स्थळ भागीदार), सिल्वरराईज ग्रुप चेयरमन श्री. संतोष बारणे, मोनिजी एंटरप्रायझेस (आतिथ्य भागीदार), श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन आणि एसएनजे एंटरप्राइजेस (मुद्रण भागीदार) यांचे सहकार्य लाभले आहे."हंट फॉर द सीक्रेट सुपरस्टार" ही स्पर्धा केवळ प्रतिभेचा शोध नाही, तर सृजनशीलता, आत्मविश्वास आणि संवेदनशीलतेचा उत्सव आहे. प्रशिक्षण शिबिरे, मेंटॉरशिप सेशन्स आणि प्रेरक सत्रांद्वारे या बालकांना त्यांच्या क्षमतेचा शोध घेण्याची आणि उज्वल भविष्य घडवण्याची संधी मिळते. संस्थेच्या "Spreading Smiles Miles & Miles" या तत्वज्ञानाला अनुसरून हा ग्रँड फिनाले एक स्पर्धा नसून, समान संधी आणि प्रोत्साहनाच्या शक्तीवर विश्वास ठेवणाऱ्या आंदोलनाचा भाग ठरणार आहे.



# सत्तेच्या शिखरावरून लोकांच्या दारी : चंद्रकांत पाटील यांची झोपडपट्टीत भावनिक भेट

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी चंद्रकांत दादा पाटील यांचा हा दौरा नियोजित केला होता. चिंचवड आणि पिंपरी विधानसभा दौरा पूर्ण झाला असून लवकरच भोसरी विधानसभा दौऱ्याचे नियोजन करण्यात येणार आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्या पिंपरी चिंचवड दौऱ्याने शहरात विकासाचा आणि उत्साहाचा नवा संदेश दिला आहे. शहरातील नागरी प्रश्न, विकासकामे आणि मूलभूत सुविधांचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित होते. त्यांनी पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि आरोग्य विभागातील अडचणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. या वेळी चंद्रकांत दादांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, "पिंपरी चिंचवड शहर हे झपाट्याने वाढणारे औद्योगिक केंद्र आहे. नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधांच्या उन्नतीसाठी प्रशासनाने ठोस आणि वेळबद्ध पावले उचलावीत," असे त्यांनी नमूद केले. आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे आणि उमाताई खापरे या शहरातील चारही आमदारांनी शहरातील विविध प्रलंबित प्रश्नाकडे चंद्रकांत दादा यांचे लक्ष वेधले आणि दादांनीही याबाबत नाराजी व्यक्त करीत पालिका प्रशासनाला फैलावर घेतले आणि आपली सकारात्मक भूमिका मांडत प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले. इतिहासात पहिल्यांदाच कॅबिनेट मिनिस्टर झोपडपट्टीतील एखादा कार्यकर्त्याच्या निवासस्थानी गेला आणि त्याच्याशी व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जाणून घेतले. हे चित्र सामान्य एका सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या मनात नवी चेतना व ऊर्जा निर्माण करणारे ठरले. बैठकीत भाजप पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न (बापू) काटे यांनी शहरातील अनियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेतील समस्या मांडून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. "हे प्रश्न नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आहेत. प्रशासनाने समन्वयाने काम करून तातडीने तोडगा काढावा," असे त्यांनी सांगितले. या दौऱ्यादरम्यानचंद्रकांतदादा पाटील यांनी शहरातील विविध भागांना भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधला. नागरिकांनी आपले प्रश्न प्रत्यक्ष मांडले, तर दादांनी संयमी व संवादशील नेतृत्वातून सकारात्मक दृष्टीकोन मांडत सर्वांचा विश्वास संपादन केला. दौऱ्यादरम्यान कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, नागरिकांत आत्मीयता आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपरी चिंचवड शहरात हा दौरा विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरल्याचे मत नागरिक व कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकरशेठ जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, मा. खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, प्राधिकरण मा. अध्यक्ष सदाशिव खाडे, संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, डॉ संजीवनी पांडे, सौ वैशाली खाडेय, राजू दुर्गे, तुषार हिंगे, केशव घोळवे, शैलेश मोरे, योगिता नागरगोजे, कुणाल लांडगे, कैलास कुटे, मंगेश धाडगे, धरम वाघमारे, जयदीप खापरे, अनिता वाळुंजकर, गणेश लंगोटे, सुनील कदम, महेंद्र बाविस्कर तसेच त्या त्या परिसरातील नगरसेवक, विविध विभाग प्रमुख, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहर स्वच्छतेसाठी नागरिकांनी ओला व सुका कचरा स्वतंत्र द्यावा!

## पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील अनेक नागरिक कचरा वर्गीकरणाचे नियम पाळत असले तरी, अद्यापही काही भागांमध्ये ओला व सुका कचरा एकत्र दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरणाबाबत असणारे नियम पाळून सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार प्रत्येक नागरिकाने घरगुती तसेच व्यावसायिक कचऱ्याचे वर्गीकरण करून देणे बंधनकारक आहे.

या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या उपक्रमांमधून नागरिक, विद्यार्थी आणि व्यावसायिकांमध्ये 'कचरा




विलगीकरण हीच खरी स्वच्छतेची गुरुकिल्ली आहे' अशी जाणीव दृढ केली जात आहे. तसेच महापालिकेने कचरा विलगीकरणाच्या दृष्टीने सोसायट्या आणि संस्थांना दोन वेगवेगळ्या रंगांचे डबे उपलब्ध करून दिले असून त्यांचा योग्य वापर केल्यास कचऱ्याचे प्रभावी वर्गीकरण होईल. या प्रक्रियेमुळे पुढील टप्प्यांमध्ये कंपोस्टिंग, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती सुलभ होईल. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरण करून स्वच्छ, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक शहरनिर्मितीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**कचऱ्याचे प्रकार आणि वर्गीकरण**

ओला कचरा : भाजीपाल्याच्या साली, अन्नाचे उरलेले तुकडे, फुलांचा कचरा, बागेतील पाने व अन्य जैविक कचरा. सुका कचरा : प्लास्टिक, कागद, धातू, बाटल्या, पॅकेजिंग साहित्य, थर्माकोल व इतर पुनर्वापरयोग्य वस्तू. घरगुती घातक कचरा : ट्यूबलाईट, बॅटऱ्या, बल्ब, तुटलेल्या धारदार वस्तू, केमिकल्स, इंजेक्शन, जैववैद्यकीय कचरा.

सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड्स, डायपर्स, बँडेजेस. ई-कचरा : खराब संगणक, लॅपटॉप, सीपीयू, टेलिव्हिजन संच, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादी.

निरीक्षण पथकांची नियुक्तीमहापालिकेच्या आरोग्य विभागाने यासाठी स्वतंत्र निरीक्षण पथके नियुक्त केली आहेत. ही पथके दररोज कचरा संकलनावेळी विलगीकरणाची तपासणी करतात. विलगीकरण न करणाऱ्या नागरिकांवर, सोसायट्यांवर किंवा व्यावसायिक आस्थापनांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे......

पिंपरी चिंचवड स्वच्छ व सुंदर ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा वर्गीकरणाचे नियम पाळून सहकार्य करावे, जेणेकरून शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि पर्यावरणपूरक होईल

**विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्तआयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.....

पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने स्वच्छतेसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत, परंतु नागरिकांचा सक्रीय सहभाग सर्वात महत्त्वाचा आहे. प्रत्येक घर आणि संस्थेने जबाबदारपणे कचरा विलगीकरण केल्यास आपले शहर 'स्वच्छतेचा आदर्श' ठरेल.

**डॉ. प्रदीप ठेंगल,**
उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका..

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे मे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734